जि.प. च्या आरोग्य, आरोग्यवर्धिनी उपकेंद्रांना बक्षीस

नाशिक । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या कायाकल्प योजनेअंतर्गत जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या ४९ प्राथमिक आरोग्य केंद्रांना व १०२ आरोग्यवर्धिनी उपकेंद्रांना नुकतेच बक्षीस प्राप्त झाले.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कायाकल्प योजनेत नाशिक जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र उसवड व आरोग्यवर्धिनी उपकेंद्रातील विल्होळी या केंद्रातील स्वच्छतेसह आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्यासाठी स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जिल्हास्तरावरील प्रथम क्रमांकाच्या पुरस्कार उसवड व विल्होळी या केंद्रांना मिळाला आहे. गांधी जयंती २ ऑक्टोबर २०१४ पासून देशात स्वच्छ भारत अभियान सुरू झाले. नागरिकांना सार्वजनिक आरोग्य संस्थेमध्ये स्वच्छता व आरोग्यदायी वातावरणात आरोग्य सेवा मिळाव्यात या उद्देशाने कायाकल्प पुरस्कार योजना राबविण्यात येत आहे या योजनेतील उत्कृष्ट उपाययोजनांवर आधारित पुरस्कृत करण्यात येते यासाठी जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी जास्त संस्थांनी या पुरस्कार योजनेमध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद म्हणून जिल्ह्यातील अनेक संस्थांनी यामध्ये आपला सहभाग नोंदवला. २०२४-२५ करिता जिल्ह्यातील ४९ प्राथमिक आरोग्य केंद्रांचा पुरस्कार प्राप्त आरोग्य संस्थेत समावेश झाला आहे. उसवड प्राथमिक आरोग्य केंद्राला दोन लाखाचा प्रथम क्रमांकाचा तर उर्वरित ४८ आरोग्य केंद्रांना ५० हजार रुपयांचा पुरस्कार मिळणार आहे. नाशिक जिल्ह्यातील १०२ आरोग्यवर्धिनी उपकेंद्राच्या पुरस्कार प्राप्त आरोग्य संस्थेत समावेश आहे. विल्होळी, तालुका नाशिक या उपकेंद्राला एक लाखाचा प्रथम पुरस्कार दरी उपकेंद्राला ५० हजार रुपयांचा द्वितीय व बेळगाव ढगा उपकेंद्राला ३५ हजार रुपयांचा तृतीय पुरस्कार मिळाला उर्वरित ९९ आरोग्य उपकेंद्रांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचा पुरस्कार मिळणार आहे. या मोहिमेची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी होण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ.हर्षल नेहते, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र बागुल, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दीपक लोणे, डॉ. युवराज देवरे, राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. राहुल हडपे यांनी सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना आपला संस्थेचा कायाकल्प होण्यासाठी मार्गदर्शन केले. पुरस्कारासाठी काया कल्प विभाग जिल्हा गुणवत्ता समन्वयक डॉ. निशिगंधा महाले, कार्यक्रम सहाय्यक कृष्णा भोये यांनी जिल्ह्याच्या संस्थांना या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रवृत्त केले तसेच पूर्व तपासणी करून संस्था गुणवत्तापूर्वक कशी करता येईल, यासाठी मार्गदर्शन केले.

> जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या अभ्यासपूर्ण नियोजन व मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील आरोग्य केंद्रामध्ये कायाकल्प उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्षेत्रातील डॉक्टर अधिकारी कर्मचारीवृंद यांच्या प्रयत्नांचे हे फलित आहे
>
> ■ डॉ. सुधाकर मोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी

> ग्रामीण भागातील आरोग्य सेवा देणारे डॉक्टर, अधिकारी, कर्मचारी, यांच्यामार्फत संस्थेत कर्तव्य बजावत असताना आत्मीयतेने मोलाचे योगदान दिल्यामुळे जिल्ह्याला हे यश प्राप्त झाले. पुरस्कार प्राप्त आरोग्य संस्थांचे अभिनंदन. या आरोग्य केंद्राच्या आदर्श घेऊन इतर सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र पुरस्कारासाठी भविष्यात प्रयत्न करतील, असा विश्वास आहे.
>
> ■ आशिमा मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. नाशिक

'किम्स मानवता'मध्ये एंडोस्कोपिक स्पाईन सर्जरी यशस्वी

नाशिक । किम्स मनवता मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल येथे नुकतीच अत्याधुनिक पद्धतीने एंडोस्कोपिक (दुर्बिणीद्वारे) तंत्रज्ञानाचा वापर करून पाठीच्या कण्याशी संबंधित विकारांवर अचूक, सुरक्षित आणि कमी वेदनादायी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

स्लिप डिस्क, स्पायनल स्टेनोसिस, मज्जातंतूंचा दाब, पाठदुखी आणि कण्यातील बिघाड यांसारख्या आजारांवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाने शस्त्रक्रिया करण्यात येत असल्याने रुग्ण लवकर बरे होत असल्याचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. राज नगरकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. न्युरो व स्पाईन सर्जन डॉ. ईशान नेरकर यांनी सांगितले की, एंडोस्कोपिक स्पाईन सर्जरीमुळे रुग्णांना अल्प प्रमाणात वेदना होतात. रुग्ण लवकर चालू लागतो आणि औषधांची गरजही कमी भासते. किम्स मानवता हॉस्पिटलमध्ये सुरू झालेली ही आधुनिक उपचारपद्धत उत्तर महाराष्ट्रातील रुग्णांसाठी एक मोठे वैद्यकीय पाऊल आहे. पारंपरिक ओपन स्पाईन सर्जरीमध्ये मोठी चिरफाड करावी लागते, दीर्घ बेडरेस्ट आवश्यक असतो, रुग्णाला अनेक दिवस हॉस्पिटलमध्ये राहावे लागते आणि स्क्रू-रॉड्सचा वापर करावा लागतो. मात्र, एंडोस्कोपिक शस्त्रक्रियेत हे सर्व त्रास टाळता येतात. ही प्रक्रिया अत्यल्प व्यत्ययाची आहे. स्क्रू व रॉड्सची गरज यात भासत नाही. रुग्ण काही तासांतच चालू लागतो. २४ ते ४८ तासांमध्ये रुग्णाला डिस्चार्जही देता येतो. ही खरोखरच स्पाईन सर्जरीतील एक क्रांतिकारी वाटचाल असल्याचे डॉ. नेरकर म्हणाले.

'थाई रिफिक' फेस्टिव्हल

इंदिरानगर । वार्ताहर

थायलंडसह जगभरात प्रसिद्ध असलेल्या 'थाई रिफिक' या आंतरराष्ट्रीय फूड फेस्टिव्हलचे नाशिकमध्ये प्रथमच आयोजन करण्यात आले आहे. हॉटेल एक्स्प्रेस इनमध्ये २० जूनपर्यंत हा अनोखा खाद्यपदार्थांची मेजवानी असलेला फेस्टिव्हल सुरू राहणार आहे.

थाई संस्कृतीची परंपरा आणि आरोग्याच्या दृष्टीने वैविध्यपूर्ण असे सकस खाद्यपदार्थ यांचा मिलाफ या फेस्टिव्हलमध्ये आहे. ङ्मथाई रिफिकफ च्या आंतरराष्ट्रीय पाककला तज्ज्ञ शेफ विना यांनी तयार केलेल्या व्हेज, नॉनव्हेज

अशा दोन्हीही प्रकारांमधील अनोख्या खाद्यपदार्थांची मेजवानी नाशिककर खवय्यांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे आयोजन शेफ विना, शेफ प्रताप चहर, हॉटेल एक्स्प्रेस इनचे जनरल मॅनेजर संजय कुमार रामानंद, विश्वजीत झा, पीआर मॅनेजर केविन संचेती यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

बक्षीस वितरण...

इंदिरानगर येथील योगेश क्लिनिकमध्य होमियोपॅथीसंदर्भात विचारण्यात आलेल्या प्रश्नमंजुषेत अचूक उत्तर देणाऱ्या नागरिकांना दादासाहेब देशमुख व चारुदत्त रायते यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी उपस्थित डॉ. धनंजय अहिरे, गायत्री भानोसे आदी.

भारतीय सेना हे शौर्याचे प्रतीक : सरना

नाशिक । प्रतिनिधी

भारतीय सेना हे शौर्याचे प्रतीक आहे. भारताला विश्वगुरु बनवयाचे असेल तर सेनेबरोबर प्रत्येक नागरिकाने देशाप्रती कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे. नाशिकच्या विकासासाठी उद्योग आणि संरक्षण क्षेत्र यांच्यातील समन्वय मोलाचे आहे. असे प्रतिपादन लेफ्टनंट जनरल सरना यांनी केले.

नाशिकच्या विकासासाठी हातात हात घालून काम करण्याचा निर्धार देवळाली येथील स्कूल ऑफ आर्टिलरी आणि निमा यांनी केला.

संरक्षण विभागातर्फे सुटे भाग उपलब्ध झाल्यास नाशिकचे उद्योजक या संधीचे सोने करून देशाच्या विकासात आपले बहुमूल्य योगदान देऊ शकतील, असे प्रतिपादन निमाचे अध्यक्ष आशिष नहार यांनी केले.

नाशिक बाजारभाव (क्विंटल)

शेतमाल	किमान भाव	कमाल भाव	सरासरी भाव
टोमॅटो	३००	२२५०	१२५०
वांगी	३०००	६०००	४५००
फ्लॉवर	६४२	१२८५	१०००
कोबी	६६६	१३३३	८४५
कारले	३७५०	५४१६	४१६६
भोपळा	१३३३	६२५०	१८००
दोडका	३३३३	६६६६	५०००
गिलके	२५००	४१६६	३३३३
गवार	४०००	६५००	५०००
भेंडी	२५००	३७५०	३३३५
काकडी	१५००	२०००	१५००
लिंब	३०००	५०००	३५००

स्थानिक नेत्यांचा विरोध बासनात

(पान १ वरून) सुधाकर बडगुजर म्हणाले, मी १८ वर्षे उबाठा गटात काम केले, पण तिथे मला योग्य तो सन्मान मिळाला नाही. त्यामुळे मी भाजपमध्ये प्रवेश केला. ज्या पक्षाने माझा अनादर केला, त्यांना आगामी महापालिका निवडणुकीत माझी ताकद दाखवून देईन.

बबनराव घोलप यांनी सांगितले की,नाशिकसह उत्तर महाराष्ट्रात भाजपची ताकद वाढवण्यासाठी आम्ही पक्षात आलो आहोत. आगामी महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये भाजपाला निर्णायक बहुमत मिळवून देण्यासाठी मी आणि माझ्या कार्यकर्त्यांनी कंबर कसली आहे. जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी स्पष्ट केले की,भाजपची विचारधारा गावागावात पोहोचवण्यासाठी हे प्रवेश निर्णायक ठरणार आहेत. नाशिक महापालिकेसह उत्तर महाराष्ट्रातील सर्व महापालिकांमध्ये भाजप सत्तेवर येईल, आणि आमचे लक्ष्य अबकी बार '१०० पार' हेच आहे. यावेळी मंचावर डॉ. राजेंद्र फडके, प्रवक्ते लक्ष्मण सावजी, जिल्हाध्यक्ष सुनील केदार, बाळासाहेब सानप, विजय साने, प्रशांत जाधव, माध्यम प्रमुख नवनाथ बन यांच्यासह भाजपचे अनेक स्थानिक व राज्यस्तरीय पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी हर्षा बडगुजर, वंदना बिरारी, शीतल भामरे, माजी सभागृह नेते दिलीप दातीर, माजी नगरसेवक अशोक सातभाई, यावल येथील प्रभाकर सोनावणे, विनोदकुमार पाटील, आर.जी. पाटील, अनिल पाटील, आरती पाटील, लताबाई पाटील, पुसदचे अश्विन जयस्वाल, छत्रपती संभाजीनगरचे भगवान पवार, उद्योजक मनोज पवार यांनीही भाजपत प्रवेश केला

वांग्याचे भाव वधारले

नाशिक । नाशिक बाजार समितीत वांग्याची आवक कमी झाली. १९० क्विंटल वांगी आली. त्यामुळे भाव वधारले. किमान तीन हजार व कमाल सहा हजार रुपये क्विंटल भाव मिळाला. कोबी व फ्लॉवरची आवक वाढल्याने भाव कमी मिळाले. फ्लॉवरला किमान ६४२ तर कोबीला ६६६ क्विंटल भाव मिळाला.

अनेक माजी नगरसेवक शिंदे गटात

(पान १ वरून) बहीण योजना, शेतकरी, कामगार, महिलांसाठी केलेले कार्य पाहून राज्यभरातून लोक शिवसेनेत सामील होत आहेत. नाशिकही याला अपवाद नाही,असे महानगरप्रमुख प्रवीण तिदमे यांनी सांगितले. २०१७ च्या नाशिक महापालिका निवडणुकीत उबाठा गटाला ३५ नगरसेवक मिळाले होते. त्यातील१९ जण शिवसेनेत दाखल,४ जण भाजपात गेले,३ नगरसेवक कालवश झाले. उर्वरित ९ नगरसेवक सध्या उबाठा गटात शिल्लक असून, आगामी काळात त्यांचाही शिवसेनेत प्रवेश होण्याची शक्यता आहे.उबाठा गटातील १२ नगरसेवकांपैकी आतापर्यंत ७ नगरसेवक शिवसेनेत आले आहेत. मनसे व काँग्रेसमधून प्रत्येकी एक, राष्ट्रवादी काँग्रेसमधून दोन नगरसेवक, आणि अन्य मिळून सध्या २५ नगरसेवक शिवसेनेत आहेत. माजी नगरसेवक १० जण झाले असून ही संख्या पुढील काही दिवसांत ५०च्या वर जाण्याची शक्यता आहे,असे उपनेते व जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी सांगितले. या प्रवेशांमुळे नाशिक महापालिकेतील राजकीय गणिते झपाट्याने बदलत असून, शिवसेना शिंदे गट भाजप आणि इतर पक्षांसाठी अधिक बळकट आणि सामर्थ्यवान प्रतिस्पर्धी म्हणून उभा राहत आहे. महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा पक्षप्रवेश शिंदे गटासाठी मोठा राजकीय बूस्टर ठरतोय अशी भावना पक्षाचे ज्येष्ठ नेते व्यक्त करीत आहेत.

शंभर पारसाठी आयारामांची मदत

(पान १ वरून) बिरारी, शीतल भामरे, माजी सभागृह नेते दिलीप दातीर या सर्वांच्या साथीने आगामी निवडणुकांमध्ये भाजपला ५१ टक्क्यांच्यावर मते मिळवून देण्यासाठी झटून काम करण्याचे आवाहन पक्षाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज केले. प्रवेश केलेल्या प्रत्येकाचा मानसन्मान राखला जाईल अशी ग्वाहीही त्यांनी दिली. उत्तर महाराष्ट्रातील सर्व महापालिकांमध्ये भाजपाची सत्ता आणणे आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत जास्तीत जास्त संख्येने भाजप उमेदवार निवडून देणे हे उद्दिष्ट ठेवूनच त्यांना स्वीकारले आहे. बडगुजर यांचा भाजपप्रवेश ही ठाकरे गटासाठी केवळ राजकीय नाही, तर जनाधार गमावण्याचीही मोठी धोक्याची घंटा आहे. काँग्रेसमधून आलेले नेतेही भाजपमध्ये गेले असल्याने विरोधी पक्षांमध्ये अस्वस्थता आणि अंतर्गत नाराजी उफाळून येण्याची शक्यता आहे. माजी नगरेसवक गणेश गिते हे पुढील आठवड्यात स्वगृही परतणार आहेत. गेले पंधरा दिवस बडगुजर यांच्या विरोधात तोफ डागणाऱ्या आमदार सीमा हिरे यांनी आज मात्र बडगुजर यांच्या पक्ष प्रवेशानंतर सबुरीचे धोरण स्वीकारले आहे. नो कॉमेंट्स म्हणत त्यांनी त्यावर प्रतिक्रीया देणेच टाळले आहे.

देशी गायी तुपाशी, इतर उपाशी

(पान १ वरून) पासून गोवंश हत्या प्रतिबंध कायदा लागू आहे. या कायद्यानुसार शेतीकामासाठी वा ओझी वाहण्यासाठी वा पैदाशीसाठी उपयुक्त नसलेली गोवंशीय बैल व वळू यांच्या कत्तलीवर बंदी घालण्यात आलेली आहे. त्यामुळे भाकड जनावरांची संख्या वाढत आहे. त्यांचे संगोपन करणे पशूपालकांना परवडत नाही. त्यामुळे मोकाट सोडतात वा गोशाळेत जनावरे पाठवली जातात. त्याचा गोशाळांना आर्थिक भार पडत असल्यानें राज्य सरकारने देशी वंशाच्या गोधनाचे जतन आणि पांजरापोळ, गोरण संस्थांना बळकट करण्यासाठी आर्थिक अनुदान देण्यासाठी ३० सप्टेंबर रोजी मंत्रिमंडळात मान्यता दिली होती. या योजनेची अंमलबजावणी गोसेवा आयोगामार्फत करण्यात येत आहे. त्यासाठी आयोग ऑनलाईन अर्ज मागवत असते. गेल्या सहा महिन्याचे अनुदान गोशाळांना मिळाले आहे.आता दुसरा हप्ता देण्यासाठी ३० जुनपर्यंत मुदत वाढवली आहे.

महाराष्ट्रातील गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत गोशाळांना भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी असलेल्या देशी गायीसाठीच हे अनुदान देण्यात येते.तसेच देशी गाय संख्या किमान ५० पर्यंत असावी तरच प्रत्येकी ५० रुपये अनुदान देण्यात येते. त्यासाठी गोशाळा, गोसदन, पांजरपोळ आणि गोरण संस्था अनुदानासाठी पात्र ठरवण्यात आल्या आहेत. या संस्थांना किमान ३ वर्षांचा अनुभव असावा. गोवंशाचे ईअर टॅग अनिवार्य करण्यात आलें आहे. त्याशिवाय अनुदान मिळत नाही. संबंधित संस्थेचें राष्ट्रीयकृत बँकेत खाते असावे.

या योजनेचे मंजूर अनुदान गेल्या जानेवारी, फेब्रुवारी व मार्च असे ३ महिन्यांचे प्रती दिन प्रती गाय ५० रुपये प्रमाणे राज्यातील ५६० गोशाळांमधील ५६ हजार ५६९ गायींसाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटी ४५ लाख ६० हजार ५०० रुपये वितरीत करण्यात आले. आता दुसरा टप्पा वाटपासाठी अर्ज मागवले आहेत, असे गोसेवा आयोग सदस्य सुनील सूर्यवंशी यांनी सांगितले.१२ जूनपर्यंत आलेले १८५ अर्ज पात्र झाले आहेत. ज्यांच्या अर्जात त्रुटी होत्या. त्या आता दुरुस्त करुन देता येणार आहेत.

देशी गायींनाच अनुदान

वरवर ही योजना अतिशय लोकप्रिय वाटत असली तरी खोलवर विचार केल्यास दुरुन डोंगर साजरा सारखी आहे. कारण गो शाळेत देशी गायी जास्त नसतात. ज्या असतात त्या गिर, विदेशी व सोडून दिलेले किंवा आणून दिलेले भाकड जनावरे असतात. ते देशी गोवंशात मोडत नसल्याने त्यांना अनुदान मिळत नाही. तसेच सध्या मजुरी व वाहतूक खर्चाचे दर वाढल्याने चाऱ्याचेही दर वाढले आहेत. सुका चारा तेरा हजार रुपये टनाने भरुन ठेवावा लागत आहे. ऊस, मका, बांडी सुध्दा चार ते साडेचार हजार टनाने विकत घ्यावी लागत आहे. ओला चारा, घास तर कुणीही उधारीत देत नाही. रोख पैसे मोजल्याशिवाय चारा मिळत नाही.अनुदान मात्र सहा महिन्यांनी मिळते. ५० रुपयांत फार काही होत नाही. फक्त नसल्यापेक्षा बरे, अशी स्थिती आहे.

शब्दकोडे : २८०



आडवे शब्द : १) आकाश ४) पंच (इंग्रजी) ७) डोळ्याला सुरमा लावण्याची काडी १२) गरजू मनुष्य १४) नशा आणणारा, कैफी १६) मगज १७) गाढव, धान्यातील कचरा १८) माणशी प्रमाण२०) पावसाची झड २१) मत देण्याची क्रिया २३) भीम, दुर्याधन यांचे शस्त्र २४) उंबरठा २७) मुलींचा घागरा ३०) अधोगती होणे, नाश पावणे ३३) मदत ३५) रममाण, निमग्न ३६) चिंता ३८) छिद्र ३९) चांदणी ४०) समुद्रातील अग्नी ४२) निमगोरा४६) पठण ४७) अर्धी ओंजळ ४८) वर्ष (ग्रा) ५०) प्रत्येक वर्षी ५२) बदल ५३) पूर्ण जळणे, राख होणे ५४) पाणी वाहून नेणारा पाट, गोंधळ (ग्रामीण शब्द) ५५) महाभयंकर (अपराध) काळजी ५६) रक्तवाहिनी ५७) घराणे ५९) पदार्थाच्या पृष्ठ भागावरील निघालेला तुकडा ६२) जरब, भीती ६४) जीभ ६६) गंध ६७) हालचाल ६९) स्वतः बद्दलचा शब्द ७१) चणचण, उणीव ७२) अनुमती ७३) अवहेलना

उभे शब्द : १) शरीर २) भरभराट ३) मातीचा कण ४) फरक, तफावत ५) एक ग्रामदेवता ६) दात ८) विश्व, दुनिया ९) श्रेष्ठ पुरुष १०) लक्ष एक आकडा ११) निमित्त १३) नमस्कार १५) सत्वयुक्त १९) मस्तक २१) मोर २२) औदार्य २३) अफवा २४) दरवाजा २५) डुक्कर २६) विसराळू २८) ललाट २९) काम, काज ३१) सरळ मार्गी ३२) बुद्धांच्या जन्मविषयक कथा ३४) रान, वन ३६) तुरुंगवास ३७) आयुष्य ४१) उपयोग ४२) पूर्ण बदल ४३) भेग, चीर ४४) व्रत ४५) हिंम्मत, हौर्य ४९) पद्धती प्रमाणे ५०) रुग्णालय ५१) बारीक सारीक ५३) अतिशय वेगाने ५४) इच्छा ५८) खटला ६०) पक्के आश्वासन ६१) *** कालव-हस्तक्षेप ढवळाढवळ ६३) केस काळे करण्याचे साधन ६५) घर ६८) पुरूष ७०) पातक

शब्दकोड२७९चे उत्तर

गु	रु	ना	न	क	■	त्रि	पु	रा	री	■	■	अ	ने	क
णा	■	ख	ट	ला	■	स्थ	■	जी	■	छा	■	न	■	ळ
का	ज	वा	■	का	ज	ळी	■	व	ल	या	का	र	■	शी
र	त	■	को	र	■	या	त्रा	■	क्ष	■	स	सा	णा	■
■	न	र	म	■	कु	त्रा	■	फ	ण	का	रा	■	■	ग
चा	■	म	ल	म	ल	■	ग	र	■	ही	■	■	को	री
क	ल	मा	■	■	क्ष	मा	■	क	म	त	र	ता	■	ब
व	हा	ण	■	रा	णी	व	सा	■	ज	री	प	ट	का	■
त	न	■	आ	ज	■	शी	त	का	ल	■	का	■	सा	रा
■	स	म	स	मा	न	■	पु	■	■	पा	■	प	र	त
फा	र	■	पा	■	स	व	ती	म	त्स	र	■	र	■	बे
से	■	क	स	र	■	र्त	■	ल	■	ध	स	का	■	रा
पा	क	ळी	■	त्न	■	न	र	मा	ई	■	न	■	का	त
र	ण	■	प्र	हा	र	■	वा	स	■	सा	ग	वा	न	■
धी	व	र	■	र	■	म	ना	■	झा	ल	र	■	स	र्व